# शैक्षणिक दाखले, कागदपत्रांची तयारी आत्तापासूनच करावी

**ॲडमिशन अपडेट**

**सीईटी परीक्षांचे अर्ज भरताना कोणतेही दाखले सादर करावे लागत नाहीत, त्यामुळे परीक्षांचे निकाल लागल्यानंतरच पालक-विद्यार्थी दाखल्यांसाठी तलाठी, तहसील, जिल्हाधिकारी कार्यालयांकडे धाव घेतात. त्या वेळी प्रचंड गर्दी होते आणि वेळ लागतो. मानसिक त्रासही सहन करावा लागतो, त्यामुळे दाखल्यांसाठीची तयारी आत्तापासूनच करावी.**

– **हेमचंद्र शिंदे**, बारामती

आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, फार्मसीसह कोणत्याही शाखेतील प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सीईटी परीक्षांचे ऑनलाइन अर्ज भरताना मूळ दाखले, कागदपत्रे किंवा त्यांच्या छायांकित प्रती सादर करण्याची आवश्यकता नसते. बारावी सीईटी निकालानंतर प्रवेश प्रक्रिया सुरू होते. मुलाखत, समुपदेशन किंवा पसंतीक्रम भरताना सर्व कागदपत्रांचा एक साक्षांकित केलेला संच व त्याचवेळी त्याची सत्यता पटविणारी मूळ कागदपत्रे सादर करावी लागतात. छाननीनंतर ती परत मिळतात. प्रत्यक्ष प्रवेश घेणाऱ्या संस्थेत पुन्हा मूळ कागदपत्रे जमा करावी लागतात, याची नोंद घ्यावी.

## वेळीच अर्ज करा

महत्त्वाचे दाखले वर्षभरात केव्हाही काढता येतात. दाखले तयार करण्यासाठी संबंधित यंत्रणेला काही कालावधी लागतो. सर्व कागदपत्रांसह अर्ज सादर केल्यानंतर त्याच केंद्रात आठवड्यात दाखला मिळतो. मे-जूनमध्ये जादा संख्येने अर्ज आल्यामुळे दाखले प्राप्त होण्यासाठी कालावधी वाढू शकतो. राजकीय, सामाजिक कारणाव्यतिरिक्त फक्त शैक्षणिक कारणासाठी राज्यात तब्बल २५ लाख विद्यार्थ्यांना कोणता तरी दाखला काढावाच लागतो. त्यामुळे वेळीच अर्ज करून दाखले काढावेत.

## दाखले कोठे मिळतात?

महत्त्वाचे दाखले तहसील, प्रांत, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातून घ्यावे लागतात. तालुक्याच्या ठिकाणी नागरी सुविधा केंद्र तसेच इतर भागातील महा-ई-सेवा केंद्र आहेत. त्यामधून प्रथम योग्य त्या दाखल्यांसाठी करावयाच्या अर्जाचे नमुने घेऊन तो भरून योग्य त्या कागदपत्रांसह अर्ज केंद्रात सादर करावा, तो सादर केल्यानंतर त्याची पोच मिळते व दाखला केव्हा मिळणार, याची वेळ नमूद केलेली असते.

## आवश्यक दाखले

कोणत्याही शाखेतील शासकीय महाविद्यालयातील प्रवेशासाठी सर्वांना राष्ट्रीयत्वाचा दाखला (नॅशनॅलिटी), रहिवासी दाखला (डोमिसाईल) आवश्यकच असतो. राखीव प्रवर्गातून प्रवेशासाठी जातीच्या दाखल्याबरोबरच जातवैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे. शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती यासाठी वार्षिक उत्पन्नाचा दाखला लागतो. आरक्षणातून प्रवेश घेण्यासाठी अनुसूचित जाती, जमाती वगळता उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर) आवश्यक असते. विशिष्ट आरक्षणातून प्रवेशासाठी म्हणजे लष्कर सेवा, अपंग प्रवर्ग, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा किंवा डोंगरी प्रदेशातील राखीव जागांवरील प्रवेशासाठी माहितीपत्रकातील नमुन्यामध्येच संबंधित यंत्रणेचा दाखला आवश्यक असतो. याशिवाय आवश्यकतेनुसार वैद्यकीय दाखला, रिपीटर विद्यार्थ्यांसाठी बोनाफाईड अथवा ॲफिडेव्हिट गॅप दाखला तसेच इतर कागदपत्रांची जुळवाजुळव करावी लागते. कृषी, पशुवैद्यकशास्त्र अशा काही विशिष्ट शाखेतील प्रवेशासाठी काही अतिरिक्त दाखल्यांची आवश्यकता असते. विशिष्ट दाखल्यांचे नमुने सीईटीच्या माहितीपत्रकातून उपलब्ध होतात. माहितीपत्रक डाउनलोड करून त्यातील माहिती अभ्यासावी.

(शब्दांकन : **ज्ञानेश्वर रायते**, बारामती)